**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातमीपत्र**

**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः10.05.2025** **वारःशनिवार**

---

1. सीमाभागात ड्रोनद्वारे घुसखोरीचा पाकिस्तानचा प्रयत्न भारतीय सैन्य दलांनी उधळला
2. भारत - पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी घेतली उच्चस्तरीय बैठक
3. राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल घेण्याचे तसंच वॉर रूम स्थापित करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
4. प्रसारमाध्यमांनी संवेदनशीलतेनं आणि जबाबदारीनं वार्तांकन करण्याची केंद्र सरकारची सूचना आणि
5. खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खात्यात 65 पदकं; पदकतालिकेतलं अग्रस्थान कायम

**<u>परराष्ट्र मंत्रालय पीसी</u>**

भारत- पाकिस्तान सीमाभागातील बारामुल्ला ते भुज पर्यंत आंतरराष्ट्रीय सीमेवर तसंच पाकिस्तान सोबत असलेल्या नियंत्रण रेषेवर बारामुल्ला, श्रीनगर, जैसलमेरसह 26 ठिकाणी ड्रोन दिसून आले आहेत. यामध्ये नागरी आणि लष्करी स्थळांना संभाव्य धोका निर्माण करणारे संशयित असे सशस्त्र ड्रोन्सचा समावेश आहे.

याबाबत भारतीय सशस्त्र दलांनी अधिक सतर्कता बाळगली आहे. अशा सर्व हवाई धोक्यांचा मागोवा ड्रोन-विरोधी प्रणालीचा वापर करून घेतला जात आहे. परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आलं असून आवश्यकतेनुसार त्वरित कारवाईही केली जात आहे. सीमावर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांना घरात राहण्याचा, अनावश्यक हालचाली मर्यादित ठेवण्याचा आणि स्थानिक अधिकाऱ्यांनी दिलेल्या सुरक्षा सूचनांचं काटेकोर पालन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

तत्पूर्वी, पाकिस्ताननं काल लेह ते सिरक्रीक भागात 36 ठिकाणी सुमारे 400 ड्रोन्सच्या मदतीनं घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. त्यातले बहुसंख्य ड्रोन्स भारतीय सेनेनं निष्प्रभ केले अशी माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी, विंग कमांडर व्योमिका सिंह आणि कर्नल सोफिया कुरेशी यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली. पाकिस्ताननं भारताच्या पश्चिमेकडील सीमाभागात लष्करी तळांवर हल्ला करण्याच्या उद्देशानं हवाई हद्दीतही घुसखोरी केली आणि नियंत्रण रेषेजवळ अत्याधुनिक शस्त्रांच्या सहाय्यानं मोठ्या प्रमाणात गोळीबार केला असं कर्नल सोफिया कुरेशी यांनी सांगितलं. पाडलेल्या ड्रोनच्या अवशेषांची तपासणी केली जात असून प्राथमिक तपासात हे ड्रोन तुर्कीचे असल्याचं आढळून आल्याचं त्या म्हणाल्या.

भारतानं केलेल्या प्रतिहल्ल्यात पाकिस्तानची हवाई संरक्षण रडार यंत्रणा नष्ट केली अशी माहिती विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी या पत्रकार परिषदेत दिली. पाकिस्ताननं केलेल्या उच्च क्षमतेच्या तोफांच्या माऱ्यात भारतीय सैन्यातील काही जण जखमी झाले तर भारतानं दिलेल्या प्रत्युत्तरात पाकिस्तानी लष्कराचंही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>पंतप्रधान</u>**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल एक उच्चस्तरीय बैठक झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, सरसेनाध्यक्ष आणि तीनही सशस्त्र दलांचे प्रमुख या बैठकीला उपस्थित होते. त्याचबरोबर पंतप्रधानांनी काल माजी लष्करप्रमुख, माजी हवाईदल आणि नौदल प्रमुख तसंच सैन्य दलातील माजी वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही भेट घेतली. यावेळी त्यांनी सध्याच्या परिस्थितीबाबत सविस्तर चर्चा केली.

**मुख्यमंत्री**

भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकंदर सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा. ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागृती करा. पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा असे काही निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले.

**बँक, अन्नधान्य**

भारत पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर देशातली सर्व एटीएम, रोकड जमा यंत्रं, पैसे जमा करण्याची किंवा काढण्याची स्वयंचलित यंत्रं तसंच बँकांच्या सर्व डिजिटल सेवा सुरळीत सुरू आहेत असं स्पष्टीकरण सार्वजनिक बँकांनी दिलं आहे. ग्राहकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन बँकांनी केलं आहे.

दरम्यान, देशात अन्नधान्याचा पुरेसा साठा असल्याचा निर्वाळा कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी दिला आहे. सध्याच्या संवेदनशील काळात नागरिकांनी संयम राखावा असं आवाहन त्यांनी केलं. तर अत्यावश्यक वस्तूंचा व्यापार करणारे, घाऊक आणि किरकोळ विक्रेते अथवा व्यावसायिकांनी यंत्रणेला सहकार्य करावं असे आदेश त्यांना दिल्याचं ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सांगितलं. साठेबाजी करणाऱ्यांविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत कठोर कारवाई केली जाईल असा इशारा त्यांनी दिला.

**माध्यम सल्ला**

वृत्तवाहिन्या, डिजिटल मंच आणि व्यक्तीगत वार्ताहरांनी संरक्षण विषयक कारवाया आणि सुरक्षा दलांच्या हालचालींबाबतच्या बातम्यांचे थेट प्रसारण करू नये असं आवाहन संरक्षण मंत्रालयानं केलं आहे. अशी संवेदनशील माहिती अथवा सूत्रांनी दिलेली माहिती बाहेर आल्यामुळे कारवाईच्या परिणामकारकतेवर परिणाम होऊन सैनिकांचा जीव धोक्यात येऊ शकतो असं संरक्षण मंत्रालयानं समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. कारगील युद्ध, 26/11 चा हल्ला आणि कंदहार विमान अपहरणाच्या घटनेत अशा थेट वार्तांकनाचा धोका दिसून आला आहे. केवळ सरकारनं नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेली माहिती प्रकाशित करण्याची परवानगी आहे असं मंत्रालयानं म्हटलं आहे. देशहिताच्या दृष्टीनं सर्व प्रसारमाध्यमांनी सतर्क राहून संवेदनशीलतेनं आणि जबाबदारीनं वार्तांकन करावं अशी विनंती मंत्रालयानं केली आहे.

**अफवा**

भारतानं पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिल्यामुळे दहशतवाद्यांना थारा देणारा पाकिस्तान पुरता निराश झाला असून या नैराश्यातून डिजिटल मंचांवर अफवा पसरवण्याचं काम करत आहे. खोटे व्हिडीओ, बनावट छायाचित्र प्रसारित करुन जगाची दिशाभूल करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे श्रोत्यांनी या कठीण काळात प्रत्येक माहिती तपासून पाहावी, विशेषतः भारतीय सैन्य अथवा सध्याच्या परिस्थितीबाबतची चुकीची माहिती आढळल्यास पीआयबी फॅक्ट चेक वर तक्रार करावी असं सांगण्यात आलं आहे. 87 99 71 12 59 या व्हॉटस ॲप क्रमांकावर तसंच socialmedia@pib.gov.in या इ मेल आयडीवर तुम्ही खोट्या माहितीबाबत तक्रार करा असं सरकारतर्फे आवाहन करण्यात आलं आहे.

**मत्स्य व्यवसाय-बुलडाणा**

राज्यात मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा देण्यासंदर्भातील शासन निर्णय राज्य सरकारने काल जारी केला आहे. दरम्यान बुलढाणा जिल्ह्यात मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त सुरेंद्र गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली अभिनव प्रयोग राबवून मत्स्य व्यावसायिकांना मोठा रोजगार उपलब्ध करून देण्यात येत आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातल्या पाच हजार कुटुंबांचं मत्स्य व्यवसाय हे उदरनिर्वाहाचं प्रमुख साधन बनलं आहे. याविषयी माहिती देताना सुरेंद्र गावडे म्हणाले.....

**जिल्ह्यामध्ये शासकीय मत्स्य बीज केंद्र कोरहाडी इथं एक शासकीय मत्स्य बीज केंद्र असून, इथून या तलाव ठेकेदारांना सुयोग्य मत्स्यबीजे चा पुरवठा केला जातो, तसचं या शासकीय मत्स्य बीज केंद्र मधून मत्स्य बीज पुरवठ्या व्यतिरिक्त जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत पथदर्शक कोळंबी संवर्धक प्रकल्प या वर्षी राबवण्यात आला. या लोकांना अधिक उत्पन्ना करता आणि चांगल्या उत्पादना करता कोळंबी बिजा.चा एक पर्याय उपलब्ध होऊ शकतो.**

## साहित्य भारती

साहित्य भारतीच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक बळीराम गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. काल मुंबईत या संघटनेच्या राज्यातील चारही प्रांतांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत प्रदेश कार्यकारिणीची निवड करण्यात आली. संस्थेच्या कार्याध्यक्षपदी शशिकांत घासकडबी, प्रदेशमंत्री म्हणून पृथ्वीराज तौर आणि संघटनमंत्रीपदी नीतीन केळकर यांची निवड झाली आहे. साहित्य भारती ही सर्व भारतीय भाषांत काम करणाऱ्या अखिल भारतीय साहित्य परिषदेची महाराष्ट्र शाखा आहे.

## गडकरी-अहिल्यानगर

सुरत ते चेन्नई महामार्गाचा मोठा भाग महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांतून जाणार असून या रस्त्यामुळे मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकास होणार आहे. असं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. अहिल्यानगर जिल्ह्यात 1 हजार 380 कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं भूमिपूजन केल्यानंतर ते काल बोलत होते.

## खेलो इंडिया

बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने 24 सुवर्ण, 21 रौप्य आणि 20 कास्य अशा एकंदर 65 पदकांची कमाई करत सहाव्या दिवस अखेर पदक तालिकेतलं अग्रस्थान कायम राखलं आहे. महाराष्ट्राने खो खो क्रीडा प्रकारात दोन्ही गटात सलग सातव्यांदा पदकाला गवसणी घातली. मुलांनी सुवर्ण, तर मुलींच्या संघाने रूपेरी यश संपादन केलं. जलतरणात पदकाचा धडका कायम ठेवत रिलेमध्ये महाराष्ट्राने एका सुवर्ण पदकासह 1 रौप्य आणि 1 कास्य पदकाची कमाई केली. नेमबाजीच्या 10 मीटर एअर रायफल मिश्र सांघिक गटात पुण्याची शांभवी क्षीरसागर आणि पार्थ माने यांनी सुवर्णपदक पटकावलं.

## पाऊस

रत्नागिरी जिल्ह्यात काल सलग तिसऱ्या दिवशी जोरदार पाऊस पडला. पुण्यातही दुपारनंतर पावसाच्या हलक्या सरी बरसल्या.

## हवामान

राज्यातल्या चारही विभागात तुरळक ठिकाणी, वीजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.